Jagdamba Education Society's
Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

*** Central Library ***

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 19/02/2025**

# Activity Name: Day Special

# दिन विशेष

## News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## मराठी नवकथेचे जनक अरविंद गोखले

अरविंद विष्णू गोखले यांना मराठी नवकथेचे जनक म्हटले जाते. त्यांचा जन्म १९ फेब्रुवारी १९१९ रोजी सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे झाला. त्यांचे शिक्षण पुणे व मुंबई येथे बी.एस्सी. पर्यंत (१९४०) झाल्यावर १९४१ मध्ये त्यांना 'दक्षिणा फेलो' होण्याचा बहुमान प्राप्त झाला. पुढे त्यांनी दिल्लीच्या 'इंपीरिअल ग्रिकल्चर रिसर्च इन्स्टिट्यूट'मधून सायटोजेनिटिक्सचा अभ्यासक्रम पुरा केला. अमेरिकेतील व्हिस्कॉन्सिन विद्यापीठात तांत्रिक वृत्तपत्रविद्येचा अभ्यास करून त्यांनी एम.एस. ही पदवी मिळविली. १९४३ पासून त्यांनी पुण्याच्या शासकीय कृषी महाविद्यालयात संशोधन आणि अध्यापन केले. १९६३ नंतर ते मुंबईच्या धरमसी कंपनीत नोकरी करीत होते.

'हेअर कटिंग सलून' ही त्यांची पहिली कथा पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या नियतकालिकात इ.स. १९३५ मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर त्यांनी साडेतीनशेहून अधिक कथा लिहिल्या. त्यांच्या बऱ्याच कथा, नजराणा (१९४४) ते दागिना (१९७२) पर्यंत प्रसिद्ध झालेल्या पंचवीस कथासंग्रहांत समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. 'कातरवेळ', 'मंजुळा', 'रिक्ता', 'कॅक्टस', 'विघ्नहर्ती' या त्यांच्या काही विशेष उल्लेखनीय कथा होत. मिथिला (१९५९), शुभा (१९६०), अनामिका (१९६१) या त्यांच्या कथासंग्रहांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके लाभली तसेच 'गंधवार्ता' कथेस एन्काऊंटर या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या इंग्रजी मासिकाचे आशियाई-अरबी-आफ्रिका कथास्पर्धेचे पारितोषिक मिळाले. त्यांच्या अनेक कथांचे यूरोपीय व भारतीय भाषांतून अनुवाद झालेले आहेत. स्वतंत्र कथालेखनाखेरीज काही वेचक अमेरिकन कथांचे अनुवाद त्यांनी केलेले आहेत तसेच ना. सी. फडके, वामन चोरघडे, व्यंकटेश माडगूळकर याच्या निवडक कथांचे संपादन केले आहे. १९५९ ते १९६३ मधील निवडक कथांची वार्षिकेही त्यांनी प्रसिद्ध केली आहेत. अरविंद गोखले यांचे २४ ऑक्टोबर १९९२ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Feb 19, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401